**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

# प्रेस नोट

दिनांक 24/09/2020 (गुरूवार)
(दुपार)

---

## फसवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 1 कि मी अंतरावर मौजा तिरूपती एजेंसी कोठारी लेआउट उमरेड येथे दिनांक 01/03/2020 चे 10.30 वा. ते दिनांक 31/08/2020 दरम्यान फिर्यादी नामे– मयुर उर्फ साहील राजू हरडे, वय 22 वर्ष, रा. जोगीठाणा पेठ उमरेड यांचे तिरूपती इंटरप्राईजेस या नावाने दुकान असुन मोबाईल व एलईडी. टिव्ही विक्री करीत करतात. आरोपी क्र 1) वन प्लस डिस्ट्रीब्युटरशिप कॉम व्यवस्थापक कंपनी व त्याच्या सोबत असलेले 2 साथीदार आरोपीतांनी त्यांच्या मोबाईल वरून फिर्यादी यांना फोन करून वन प्लस कंपनी मध्ये असल्याचे सांगुन एलसीडी. टिव्ही मोबाईल ची त्यांना डिलर शिप मिळालेली आहे. अश्या प्रकारचे आमिष दाखवुन आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीला पैसेसाठी वारंवार कॉल करून पैसेची मागणी केली. आरोपीतांनी फिर्यादी सोबत कंपनी बाबत वेबसाईडवर कागदी करारनामा तयार करून पाठविला फिर्यादी व गुन्हयातील साक्षदार आरोपीतांचा आमिषाला बळी पडल्याने वारंवार बॅकेच्या माध्यमातून आरटीजीएस व्दारे 7,46500/–रू. ट्रॅन्सफर केले. फिर्यादीला आरोपीतांकडुन वारंवार पैशाची मागणी होत असुन डिलीव्हरी ऑर्डर मिळुन आला नाही असे लक्षात येताच फिर्यादीने आरोपीतांचे कंपनी बाबत सखोल माहीती घेतली असता बनावट कंपनी असल्याचे माहीत झाले त्यावरून फिर्यादी यांना त्यांची फसवणुक होत असल्याचे समजताच फिर्यादीने पो. स्टे. उमरेड येथे तक्रार दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपीतांविरुध्द कलम 420, 34 भादंवि. सह कलम 66(ड) माहिती तंत्रज्ञात कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. काळे 9867112185 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 23/09/2020 चे 08:00 वा. चे पुर्वी 5 महिण्यापासून 38 वर्षीय पिडीत/फिर्यादी हिचा आरोपी नामे– बालु बुटे, वय 45 वर्ष, रा. ब्राम्हणी, वार्ड क्र. 6, कळमेश्वर याने तिचा पाठलाग करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 354 (ड) भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक चवरे या करीत आहे.

## जबरी संभोग

पो.स्टे. कळमेश्वर :– दि. 22/08/2020 चे 23:00 वा. ते दि. 22/09/2020 चे 04:00 वा. 17 वर्षीय पिडीत/ फिर्यादी हिला आरोपी नामे– प्रविण प्रभाकर ब्राम्हणे, वय 24 वर्ष, रा. बोरगाव ता. कळमेश्वर याने तिचा अज्ञानपणाचा फायदा घेत तिला लग्नाचे आमिष दाखवुन पिडीतेसोबत बळजबरीने जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 376 भादंवि. सहकलम 4, 8 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला सहायक पोलिस निरीक्षक अमृता चवरे 9867672244 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर